**ठळक बातम्या**

- औद्योगिक संबंध संहिता सुधारणा विधेयक २०२६ आज लोकसभेत मंजूर, भारत अमेरिका व्यापार कराराबाबत लोकसभेत गदारोळ, विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव

- सरकार स्वावलंबी भारताच्या निर्मितीसाठी काम करत असल्याचं राज्यसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्य सरकारचे टाटा ट्रस्ट आणि नाम फाउंडेशनशी १३ सामंजस्य करार

- केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांविरोधात देशातल्या १० प्रमुख कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला राज्यात संमिश्र प्रतिसाद

**आणि**

- टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा नामिबियाशी सामना

**<><><><><>**

आर्थिक वाढ आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देऊन सरकार स्वावलंबी भारताच्या निर्मितीसाठी काम करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. त्या आज राज्यसभेत अर्थसंकल्पावरल्या चर्चेला उत्तर देत होत्या. सरकारला महागाई नियंत्रणात ठेवण्यात तसंच विकासदर कायम ठेवण्यात यश आल्याचं त्या म्हणाल्या. २०२५-२६ मध्ये देशाचं सकल देशांतर्गत उत्पादन ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढलं असं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट सीतारामन (३१ सेकंद)**

देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जात आहे, या अर्थसंकल्पातून देशांतर्गत उत्पादन क्षेत्राविषयीचा सरकारचा दृष्टीकोन दिसून येतो, असं सीतारामन म्हणाल्या. बायोफार्मा, सेमिकंडक्टर मिशन २.०, वस्त्रोद्योग आदी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे, मनुष्यबळाचा विकास करण्यावर सरकारने लक्ष केंद्रित केल्याचं त्यांनी नमूद केलं.

त्याआधी सभागृहात सर्व पक्षाच्या सदस्यांनी अर्थसंकल्पावर चर्चा केली.

<><><><><>

औद्योगिक संबंध संहिता सुधारणा विधेयक २०२६ आज लोकसभेत मंजूर झालं. कामगार संघटना कायदा १९२६, औद्योगिक रोजगार कायदा १९४६ आणि औद्योगिक विवाद कायदा १९४७ यांच्या ऐवजी औद्योगिक संबंध संहिता २०२० लागू करण्यात आली आहे. याच्या अंमलबजावणीत भविष्यात कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी औद्योगिक संबंध संहिता सुधारणा विधेयक २०२६ आणलं गेलं आहे.

या विधेयकावरल्या चर्चेला कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी सभागृहात उत्तर दिलं. नवा कामगार कायदा कामगारांच्या हितासाठी आणला गेल्याचं देशातल्या सतरा कामगार संघटनांनी मान्य केलं असून मोजक्या संघटनांचा याला विरोध असल्याचं मांडवीय म्हणाले. हा कायदा मजुरांना किमान वेतनाची हमी देतो, कोणत्याही राज्य सरकारला किमान वेतनापेक्षा कमी वेतन देता येणार नाही, असं ते म्हणाले. महिला आणि पुरुषांना समान वेतन तसंच वेळेवर वेतन मिळण्याची हमी या कायद्यामुळे मिळणार आहे. चाळीस वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या कामगारांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी केली जाईल, या कायद्यामुळे नवीन रोजगार निर्मिती होईल, असंही मांडवीय म्हणाले.

<><><><><>

सत्ताधारी आणि विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब होण्याआधी दोन वेळा तहकूब झालं.

सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. त्यानंतर लगेच विरोधी पक्ष सदस्यांनी भारत- अमेरिका व्यापार कराराविरोधात घोषणाबाजी सुरू केली तसंच हा करार आणि चार कामगार कायदे मागे घ्यावेत अशी मागणी केली.

या गदारोळातच मंत्री श्रीपाद नाईक यांनी प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू केल्यामुळे गदारोळ वाढत गेला. आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज तहकूब केलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी सादर केलेल्या

औद्योगिक संबंध संहिता विधेयकावर झालेल्या चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे खासदार रवींद्र वायकर, काँग्रेसचे खासदार एम के विष्णु प्रसाद यांनी भाग घेतला.

दरम्यान, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात आपण हक्कभंग नोटीस दिल्याचं भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी वार्ताहरांना सांगितलं. राहुल गांधी परदेशात जाऊन सोरोस फाऊंडेशन, USAID, फोर्ड फाऊंडेशन अशा संस्थांशी संधान साधत भारतविरोधी शक्तींशी हातमिळवणी करतात हे आपण आपल्या नोटीशीत सांगितल्याचं दुबे म्हणाले.

- **- - होल्ड बाईट दुबे - - -**

- **<><><><><>**

राज्य सरकारनं आज टाटा ट्रस्टशी १२ तर नाम फाउंडेशनशी एक, असे १३ सामंजस्य करार केले. या करारांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातला विकास संपूर्ण राज्यभर पोहोचणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले.

यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला आणि बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे, टाटा ट्रस्ट चे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर उपस्थित होते.

ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला आणि बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री साहाय्यता निधी, नागपूरची राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्याशी संबंधित करार टाटा ट्रस्टशी तर नाम फाउंडेशनचा करार जलसंधारण विभागाशी झाला आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या अप्रत्यक्ष करांच्या माध्यमातून नव्याने केलेल्या सुधारणा सरकारच्या विकासाभिमुख दृष्टीकोनाला पूरक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क विभागाचे अध्यक्ष विवेक चतुर्वेदी यांनी आज केलं. विभागातर्फे मुंबईतल्या न्यू कस्टम हाऊस इथे आयोजित संवाद सत्राला ते संबोधित करत होते.

<><><><><>

केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांविरोधात देशातल्या १० प्रमुख कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंद ला आज राज्यात संमिश्र प्रतिसाद मिळाला. राज्यात अनेक ठिकाणी संघटनांनी शांततापूर्ण निदर्शनं केली, त्यादरम्यान कुठेही अनुचित प्रकार घडल्याचं वृत्त नाही. नवे कामगार कायदे, बियाणेविषयक विधेयक, वीज सुधारणा विधेयक, तसंच अणुऊर्जा विकास विधेयक मागे घ्यावं, विकसित भारत जी राम जी योजनेऐवजी मनरेगाचं पुनरुज्जीवन करावं, या आणि इतर मागण्यांसाठी विविध कामगार संघटनांनी एकत्र येऊन आजचा बंद पुकारला होता. मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीची कामगार संघटना सीटू चे राज्य अध्यक्ष डी एल कराड यांनी सांगितलं, की मुंबईत वांद्रे- कुर्ला संकुलातल्या राज्य कामगारआयुक्तांच्या कार्यालयासमोर निदर्शनं केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते सचिन अहिर यांनी या बंदला आपल्या पक्षाचा पाठिंबा असल्याचं सांगितलं.

पालघर, पुणे, बीड, नाशिक, जळगाव, रत्नागिरी,  धुळे, लातूर आणि गडचिरोली इथंही आंदोलन झालं.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात इटलीनं १० गडी राखून विजय मिळवला. इटलीनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. नेपाळचा डाव १२३ धावांवर आटोपला. इटलीनं एकही गडी न गमावता अवघ्या १३ षटकात हे आव्हान पूर्ण केलं.

आज श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेनं ओमानवर १०५ धावांनी विजय मिळवला. ओमाननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचं ठरवलं. फलंदाजीसाठी उतरलेल्या श्रीलंकेनं २० षटकात ५ गडी गमावून श्रीलंकेनं २२५ धावा केल्या. मात्र ओमानला २० षटकात ९ बाद १२० धावाच करता आल्या.

याच स्पर्धेत आज भारताचा सामना नामिबियाबरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर सुरू आहे. नामिबियाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

परभणी महानगरपालिकेच्या महापौरपदी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सय्यद इक्बाल यांची निवड झाली आहे. आज झालेल्या निवडणुकीत सय्यद इकबाल यांना ३९, तर भाजपाच्या तिरुमला खिल्लारे यांना २६ मतं मिळाली. उपमहापौर पदी काँग्रेसचे गणेश देशमुख यांची ३७ मतांनी निवड झाली.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहेत. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//